# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

दालन क्र.एम-७ ए, पोटमाळा, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.

दूरध्वनी क्रमांक :०२२-२२०२३४४५ e-mail: pritamkumar.jawale@nic.in

क्रमांक: मुद्रांक-२०१७/प्र.क्र.२३६/म-१ दिनांक : ०४ सप्टेंबर, २०१८

प्रति,

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
तथा मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय :- सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता वार्षिक बाजार मूल्यदर तक्ते तयार करण्याबाबत.

संदर्भ:- १) MCHI-CREDAI, मुंबई यांचे मा.मुख्यमंत्री महोदयांना अग्रेषित दि.०५ एप्रिल, २०१७ रोजीचे पत्र.
२) समक्रमांकाचा दि.०९ जानेवारी, २०१८ रोजीचा शासन निर्णय.
३) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग ४-ब, क्र.मुद्रांक-२०१७/प्र.क्र.२३६/म-१, दि.१२ मार्च, २०१८.
४) शासनाचे समक्रमांकाचे दि.३१ मार्च, २०१८ रोजीचे पत्र व त्यानुषंगाने मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी तथा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.३१ मार्च, २०१८ रोजीचे आदेश क्र. का.१५/वामुदत २०१८-१९/३५३.
५) शासनाचे समक्रमांकाचे दि.०४ मे, २०१८ रोजीचे पत्र.

महोदय,

संदर्भ क्र.१ च्या निवेदनाच्या अनुषंगाने संदर्भ क्र.२ अन्वये मा.मंत्री (महसूल) महोदयांच्या अध्यक्षतेखाली गठीत मंत्रिमंडळ उपसमितीने सखोल विचारविनिमयांती सादर केलेल्या अहवालावर मा.मंत्रिमंडळाने दि.३१ जुलै, २०१८ रोजीच्या बैठकीत निर्णय घेतला आहे. मा.मंत्रिमंडळाचा उक्त निर्णय खालील प्रमाणे कळविण्याचे मला निर्देश आहेत.

"वार्षिक बाजारमुल्यदर तक्ते २०१७-१८ या मधील मुंबई महानगर प्रदेशातील महानगरपालिका/ नगरपालिका क्षेत्रातील जमिन दरांमध्ये दिनांक १ एप्रिल, २०१७ पासून केलेल्या वाढीला दिनांक १९ मे, २०१७ ते दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ या ४ महिन्यांच्या कालावधीकरिता दिलेली स्थगिती उठविल्यामुळे, उक्त स्थगिती कालावधीतील व्यवहारांवरील मुद्रांक शुल्काच्या तसेच नगर विकास विभागाकडील विनियमानुसार अधिमुल्य/ इतर शुल्क आकारणीच्या फरकाची वसूली करण्यात यावी. उक्त वसुली

करण्यासाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतूदीनुसार तसेच नगर विकास विभागाच्या विनियमानुसार कार्यवाही करण्यात यावी. तथापि, उक्त मुद्रांक शुल्काची/ अधिमुल्याची वसुली करताना व्याजाची आकारणी करु नये."

तरी, मा.मंत्रिमंडळाच्या उक्त निर्णयानुसार उचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करण्याची विनंती आहे.

आपला,

प्रितमकुमार जावळे 04.09.18

(प्रितमकुमार जावळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव,

१. मा.प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नगर विकास विभागाकडील विनियमानुसार अधिमुल्य/ इतर शुल्क आकारणीची वसूली करण्याबाबत.
२. CREDAI-MCHI, Mekar Bhavan II, 4th Floor, 18, V.Thackersey Marg, New Maine Lines, Mumbai-400 020.
३. निवड नस्ती, कार्यासन म-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

MAHARASHTRA CHAMBER OF HOUSING INDUSTRY
17937
21/9/18